# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १५/०४/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १५/०४/२०११ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. ०६/०४/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ३. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| ४. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ५. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| ६. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |
| ७. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ८. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ९. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १०. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ११. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| १२. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| १३. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १४. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १५. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |
| १६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १५/०४/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१, दि. ०६/०४/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.प्रकरण क्र.१, दि. ०५/०८/२०१० व दि. १३/०८/२०१० रोजीचे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, मागच्या स्टँडींगमध्ये ठराव केला होता. प्रकरण क्र.३६ बी.एस.यु.पी. योजनेचे निविदेस मंजूरी देणेबाबत आज ती कोणत्या टप्प्याला काम चालू आहे. त्याचं जरा निवेदन केलं बर होईल.

**मा. सभापती :-**

नंतर चर्चा करुया.

**शशिकांत भोईर :-**

पान क्र.१९ वर ठराव करण्यात आलेला अनिल सावंत आहे. त्याच्यामध्ये पान नं.१९, १८ वा रक्त पेढीतील कर्मचा-यांच्या तांत्रिक किंवा लेखी चुकांच्या परिणामाला कायदेशीर कारवाईला संस्था जबाबदार राहील. कुठलीही म्हणजे काय?

**नगरसचिव :-**

तिथे कोणतीही हा शब्द येईल.

**शशिकांत भोईर :-**

ठरावामध्ये पण तसंच आहे. तर त्याच्यात सुधारणा करावी. कारण आपण अटीशर्ती मंजूर करतो ना. त्यामध्ये कुठलाही गैरफायदा घेऊ शकतात.

**भगवती शर्मा :-**

दि. ०५/०८/२०१० व दि. १३/०८/२०१० रोजीचे मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. ०५/०८/२०१० व दि. १३/०८/२०१० रोजीचे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. ०५/०८/२०१० व दि. १३/०८/२०१० रोजीचे मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२, परिवहन उपक्रमामध्ये जीपीआरएस सिस्टम लागु करणेस मान्यता देणेबाबत.

**दिनेश नलावडे :-**

मा. सभापती साहेब, परिवहन सेवेचे अधिकारी सावंत साहेब आहेत त्यांनी जरा याच्याबद्दल थोडी माहिती द्यावी सिस्टम काय आहे ते सांगा?

**दिपक सावंत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, केंद्र शासनाला जेएनएनयुआरएम अंतर्गत पहिल्या टप्प्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेला ५० बसेस मंजूर झालेल्या होत्या. या बसेस ची टोटल कॉस्ट ४ करोड रुपये होती. त्यापैकी ५० टक्के कॉन्ट्रॅक्टर आणि ५० टक्के केंद्र शासनाकडून अनुदान मिळत होते. या सिस्टिममध्ये बसेस आणि त्या बसेस बरोबर आयटीएस कम्पोनंट त्याच्यामध्ये लीड बोर्ड, ग्लोबल ............ सिस्टिम बसमध्ये ट्रॅकिंगसाठी त्याचबरोबर बसेसमध्ये दोन सीसी कॅमरे, टी.व्ही. त्याचबरोबर शहरामध्ये १५ ठिकाणी पीआयएस (पब्लीक इंन्फॉर्मेशन सिस्टीम) दर्शविणारे बोर्ड ही सिस्टम सुध्दा ११ करोड रुपये मंजूर करताना इंन्क्लुड केली होती. त्यापैकी केंद्र शासन ५० टक्के देणार आणि ५० टक्के पीपीपी च्या माध्यमातून कॉन्ट्रॅक्टर देणार. लेड बोर्ड ते आपण बसचं ऑपरेटींग आणि मेन्टनंन्स आहे ते सुध्दा ५ वर्षासाठी ती कंपनी करणार आहे. या संबंधी ही निविदा आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण ठेकेदारांकडून करुन घेणार आहोत की पालिका तर्फे करणार आहोत आपण निविदा काढलेली आहे.

**दिपक सावंत :-**

हो.

**शशिकांत भोईर :-**

मग आपल्यातर्फे ठेकेदाराने जेएनएनयुआरएम मध्ये करणार आहे ना.

**दिपक सावंत :-**

जेएनएनयुआरएम अंतर्गतच आहे. टोटल जी कॉस्ट ११ करोड रु. होती. त्याच्यामध्ये बस खरेदी करणे, चेसीस खरेदी करणे, ते बॉडी बिल्डींग करणे आणि हे आयटीएस कंम्पोनंट आहे. लेड, जीपीएस, सीसी टीव्ही कॅमेरा आणि पीआयएस सिस्टीम ते लावून एकत्र करुन ही कॉस्ट होती. आपण पहिल्यांदा बस, चेसीस खरेदी केल्या. बॉडी बिल्डींग करुन घेतले. हा उरलेला कंम्पोनंट आपला राहीला होता. आपण त्याच्यासाठी वेगळी निविदा मागवली आहे. याच्यासाठी जो ५० टक्के खर्च आहे. तो केंद्र शासनाच्या योजनेतून होणार उरलेला ५० टक्के जो खर्च आहे तो कॉन्ट्रॅक्टर करणार.

**दिनेश नलावडे :-**

सावंत साहेब, आपण हे जे कॅमेरा वगैरे बस मध्ये बसवणार आहेत किंवा ऑफिस मध्ये कारण आता मा. सभापती साहेबांच्या गाड्या, अधिकारींच्या गाड्या आणि लोकप्रतिनिधींच्या गाड्यात वॉकी टॉकी बसवली होती. पण वॉकीटॉकी कधी कुठल्याच गाडीमध्ये केव्हा चालली नाही. तर त्या पध्दतीने हे काम तसं नाही ना. दुसरी गोष्ट की हे चायना मेडचं सामान आहे का? कारण, जेएनएनयुआरएम च्या माध्यमातून चायना मेडचं कुठलही सामान गाडीमध्ये बसवलंच नाही. कदाचित माझ्या महितीनूसार असं आहे.

**दिपक सावंत :-**

जेएनएनयुआरएम आमचा नॉर्मस् आहे. त्याच्यामध्ये आपल्याकडुन अंडर टेकींग घेतात की नो चायना मेड प्रोडक्ट इज देअर. त्यांनी ते बंद केलेलं आहे. चायना मेड अलाऊड नाही. दुसरी गोष्टी ही जी सिस्टम आहे. आपण हे १ एम. ऑपरेशन अँन्ड मेंन्टेनन्स सुध्दा ५ वर्षासाठी दिलेले आहे. लेड बोर्ड मागे पुढे बसमध्ये एक आणि साईडला असे ४ ठिकाणी राहणार. सीसीटीव्ही कॅमेरा, दोन असणार मागे पुढे असणार आहे त्याच्यावर पी.आय.एस. सिस्टीमचा मोठा बोर्ड असणार. आपल्या मोठ्या-मोठ्या चौकी आहेत तिथे आणि हे केल्यानंतर ह्याच ऑपरेशन आणि मेन्टनन्स साठी एक कंट्रोल रुम असणार आहे. त्या कंट्रोल रुममध्ये दररोजची ग्लोबल पोजिनिंग सिस्टम काय असणार आहे. त्याचं रेकॉर्डींग होणार. उत्तनला बस गेली किंवा ठाण्याला बस गेली तरी ते आपल्याला सेटलाईट थ्रु दिसणार. आपल्या ५० च्या ५० बसेस कुठे आहेत? कुठल्या रुटवर चालल्या आहेत? कुठे बंद पडली तरी ते सुध्दा सिस्टीम नुसार दिसणार त्याच्यामुळे हे फक्त लावलं नाही. आपण ऑपरेशन ॲन्ड मेंटेनन्सचं टेंडर सुध्दा ५ वर्षासाठी काढलेलं आहे.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, ५० बसेस सेंट्रल गव्हर्नमेंट जेएनएनयुआरएम, आणि आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातुन मागवलं आहे. साहेब, ठेकेदाराकडुन टोटल नविन बस २५० येणार होत्या आता फक्त ५० बसेस आलेल्या आहेत. बाकीच्या बसेस आणि जून्या ५० बसेस बंद आहेत अजून त्याचा पत्ता नाही आणि या नविन बसेस केव्हापर्यंत येणार? नविन ५० बसेस आल्या पण त्याच्या व्यतिरीक्त एसी च्या बसेस बाहेरच्या संस्था चालणार होत्या त्या बसेस केव्हापर्यंत येतील?

**मा. आयुक्त :-**

या महिन्या अखेरपर्यंत येतील आणि आपल्या माहितीसाठी मागच्या वेळेला प्रश्न विचारला होता की, ठेकेदाराने अजून पैसे भरले नाही. आपण फिक्स डीपॉझिट मोडून खर्च केलं. लवकर बसेस यावं म्हणून त्यांनी शनिवारी ४ कोटी १४ लाखाचा डिमांड ड्राफ्ट दिला आणि ती रक्कम जमा झाली आणि रॉयल्टी मागच्या महिन्यापर्यंत आमच्याकडे जमा झालेली आहे. पाठीमागच्या महिन्याचं मेन राहिलेलं आहे. त्यामुळे सर्व कंडक्टर आहे जी रक्कम जमा होती रक्कम तो दिला नाही. तर त्या कंडक्टर कडुन ती रक्कम जमा करुन घेऊन त्याचा रॉयल्टीची पावती देतो. फक्त मागच्या महिन्याचीच मिळालेली नाही ते ५७,००० रु. कॅश घेतली आणि त्याला पावती दिली. दररोज येत ते जमा करुन घेतो. रॉयल्टी २-३ लाखाची असते. २-३ लाख संपल्यांनंतर घ्यायचं बंद करतो म्हणजे त्याच्याकडुन आता आपल्याला येण काही नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, आपण अतिशय चांगली सुरुवात करतो. मागच्या वेळेला त्या बसेसच्या बाबतीत मी काल उत्तनला गेलो होतो. येताना ४ बस बघितला त्या चारही बसेसच्या पाठीमागे काचा नाही. कितीतरी वेळा या विषयावर चर्चा झालेली आहे. तुम्ही त्यावेळेला अत्याधुनिक सेवा आणि सुविधा पुरविणार आहोत या गोष्टी एका साईडने करतो. त्या टाईमाला अधिकाऱ्यांनीच तरी कमीत कमी बघुन घ्या. बसला पाठीमागे काचा नाही. मी काल गोराई वरुन आलो. चार बस बघितल्या दोन बसला अर्ध्या काचा आहेत आणि अर्ध्या नाहीत आणि दोन बसला पुर्ण काचा नाहीत. आत्ता आपण एका साईडमधुन सगळ ऑपरेट करणार आहोत एका ठिकाणी बसून सीसी कॅमेरा लावतो. त्याच्यामध्ये काय नेमकं बघायचं आहे किती उघड आहे? त्याची परिस्थीती काय आहे? काय दाखवणार आहात? जे कामे खर्चाचं काम आहे ते आपल्याकडुन पूर्ण होत नाही. एका साईडतून आपण ५० टक्के कॉन्ट्रॅक्टर बनणार आहोत म्हणून ५० टक्के आपण आपले लावत चाललो त्याचा उपयोग किती चांगला होतो तो महत्वाचा विषय आहे. वारंवार या विषयावर चर्चा झालेली आहे का ते व्यवस्थित होत नाही त्याच्याबद्दल माहिती सांगा.

**दिपक सावंत :-**

या ज्या जून्या बसेस आहेत ते जेएनएनयुआर एम अंतर्गत नाही त्या जून्या बसेसचा टोटल कॉस्ट त्या कॉन्ट्रॅक्टरने बेअर केलेली आहे. त्या कॉन्ट्रॅक्टरला हॅन्डओव्हर केल्यानंतर पूर्वीच्या कॉन्ट्रॅक्टर.........

**लक्ष्मण जंगम :-**

न रिपेअरींग करता चालवायचं असं ठरलेलं आहे का?

**दिपक सावंत :-**

५० बसेस हॅन्डओव्हर केल्यानंतर त्याच्यापैकी काही बसेस २००५ मध्ये आणल्या होत्या. काही बसेस २००७ मध्ये आणल्या होत्या. काही बसेस २००८ मध्ये आणल्या होत्या. ते २००८ मध्ये आणलेल्या बसेस व्यवस्थित आहे. जे २००५ मध्ये ३० बसेस आणलेल्या आहे त्या बसेसची कंडीशन त्याप्रमाणे चांगली नाही. त्यापैकी १० बसेसची संपूर्ण बॉडी चेसीस आहे बॉडी आहे. बॉडी बिल्डींगसाठी आणि जे इंजिन डाऊन झालेले आहे. त्या रिपेअर करण्यासाठी त्यांनी कॉन्ट्रॅक्टर कडे दिलेलं आहे आणि ते दुरुस्त झाल्यानंतर..........

**भगवती शर्मा :-**

साहेब, तुम्ही दिशाभुल करु नका त्यांनी सांगितले ज्या बसेस ची काच पाठीमागे नाही त्याच तुम्ही उत्तर द्याना त्याच तुम्ही काय करणार?

**दिपक सावंत :-**

जून्या बसेस टप्प्या-टप्प्यात दुरुस्त करतो.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, ज्या बसेस गॅरेजमध्ये आहेत त्याच्याबद्दल मी माहिती सांगितलेली नाही. रस्त्यावर ज्या बसेस चालू आहेत त्याच्याबाबतीत मी तुम्हाला विचारलं आणि वस्तुस्थिती सांगितली. त्याबद्दल तुम्ही खुलासा करता का? ज्यांची इंजिन उतरुन ठेवली त्याच्याबद्दल सांगुन काय उपयोग आहे?

**दिपक सावंत :-**

साहेब, ३० बसेस खराब आहेत. ३० बसेस ज्या आहेत त्या टप्प्याटप्प्यात..........

**लक्ष्मण जंगम :-**

त्या चालतात का? रोडवर खराब आहेत त्या?

**दिपक सावंत :-**

काच वगैरे असेच ते चालू आहे. तुम्ही मला त्या दिवशी पण २१ नंबर बसच सांगितलं तर ती बस मी लगेच बंद केली. त्या-ज्या बसेस आहेत त्या बघुन दुरुस्त करुन घेवू.

**शशिकांत भोईर :-**

आपण पॅसेंजर वाहून नेतो. त्यांना जर काही दुखापत झाली मागुन ठोकलं किंवा कोणाला वाटल उडी मारावी तर त्याला सेफ्टी काय आहे? काचा वगैरे फुटल्या असतील तर त्या ताबडतोब.........

**मा. आयुक्त :-**

उडी मारणारा बस वरुन मारणार नाही. तो घरावरुन पण मारेल ना. पुढच्या मिटींगला ज्या बसेस चालू आहेत त्या तपासायला स्थायी समिती पुढे आणा.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, कसं आहे की, बस चालू असताना पाठीमागे सिटवर लेडीज लहान मुलांना घेऊन बसतात ज्या बसच्या काच्या नाहीत स्पीड ब्रेक वगैरे झाला तर कदाचित एखादं मुलचं बाहेर पडलं तर काय करणार? आणि पाठच्या सिटवर बसल्यावर सिटच्यावरती एवढा पोरशन राहतो.

**मा. आयुक्त :-**

किती गाड्यांचा काचा तुटलेल्या आहेत?

**दिपक सावंत :-**

साहेब, त्यांना आम्ही विचारचं त्या गाड्या २००५ च्या जून्या गाड्या आहेत त्यांचे प्रॉब्लेम होते.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही इन्स्पेक्शन करा.

**मा. आयुक्त :-**

काचा किती तुटले? ते बसवणार कधी तेवढं सांगा ना.

**दिपक सावंत :-**

साहेब, या आठवड्यात करुन घेतो.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही मला सांगा. तुमच्याकडे त्याची योग्य माहिती नाही असा तुम्ही खुलासा करा. तुमच्याकडे त्याची पूर्ण माहिती नाही तुम्ही बघितलेलं नाही. गोराई वरुन सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत मी ४ बसेस बघितल्या त्यामध्ये २ बसच्या अर्ध्या काचा आहेत. आणि दोन बसच्या पूर्ण काचा नाहीत. मी खात्रीपूर्वक सांगतो तुम्ही अशी माहिती का देऊ शकत नाही? गोराई ते वेस्ट पर्यंत ही परिस्थीती आहे तर पूर्ण शहरामध्ये कशी परिस्थीती असेल.

**मा. सभापती :-**

दोन बसेसच्या काचा तुटलेल्या आहेत ते मला माहित आहे.

**मा. आयुक्त :-**

दोन बसेसच्या काचा तुटलेल्या आहेत त्या दुरुस्त करुन होतो म्हणा.

**मा. सभापती :-**

१५ दिवसांपासून मी बघतो म्हणून मला माहित आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

४ बस आहेत मी कालची परिस्थीती सांगतो. काल आंबेडकर जयंती होती तर मी गोराईला गेलो होतो एकाच टाईमाला येताना ४ बसेसच्या काचा तुटलेल्या दिसल्या.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही नंबर पहिला नसेल ना. काचा दोन बसेसच्या तुटलेल्या आहेत.

**दिपक सावंत :-**

तुटलेल्या बसच्या काचाचं दुरुस्त करुन रिपोर्ट सादर करतो.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती साहेब, नेक्स्ट मिटींग मध्ये आम्हाला अहवाल द्या किती बसेस आहेत? किती बसेस चांगल्या अवस्थेमध्ये आहे आणि किती बस रिपेअरींगला गेले आहेत? किती जाणार आहेत? संपूर्ण माहिती द्याना.

**मा. आयुक्त :-**

२ बसेसच्या काचा तुटलेल्या आहेत. ते दोन दिवसांत दुरुस्त करुन तुम्हाला सांगु.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, काचा तुटलेल्या गाड्या आहेत ना अपघाताचा प्रश्न बाजूला राहिला परंतु मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बसेसच्या काचा तुटलेल्या आहेत.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, आता तुम्ही १५ दिवसांपासुन दोन बसच्या काचा तुटलेल्या आहेत किंवा निघालेल्या आहेत असं बघितलं आहे. म्हणजे तुम्ही वेस्टचं बघितलं आहे. पूर्ण शहरामधल्या ठिक-ठिकाणच्या लोकांना अनुभव असेल तुम्ही दोन बसचं कसे म्हणता?

**मा. आयुक्त :-**

दोन गाड्यांच्या काचा तुटलेल्या आहेत. तुम्हाला आता बघायचं असेल तर आता जाऊ या.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, आपली सभा चालू आहे नंतर आपण जावू. पण १५ दिवसांपूर्वी हाच विषय होता त्याच्या अगोदर ही हाच विषय होता. कदाचित ह्याच्यानंतर पूढच्या ह्याच्यामध्ये त्याची काही व्यवस्था झाली नाही तर हाच विषय येईल.

**मा. आयुक्त :-**

साहेब, असं करत असताना घडत असत आणि दोन दीवसांत दुरुस्त करुन तुम्हाला अहवाल सादर करतो ना.

**भगवती शर्मा :-**

साहब, अभी इस चर्चा को बढाते जाऐंगे तो बढती जाएगी। आज जो डायरेक्शन दिये जा रहे है तो अगली मिटींग के अंदर फिर भी कुछ रहा तो सिधे हम सभी सदस्य मिलके कारवाई करने का आदेश सभापती माध्यम से देंगे क्योकी एक विषय बार-बार नही होना चाहीए।

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाने JNNURM या केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत मंजूर बसेस करीत केंद्र शासनाच्या धोरणानूसार बसेस करीता LED, GPS, CCTV, PIS पुरवठा करणे कामाची १) दि.२५/११/२०१० रोजीची "दै. फ्री प्रेस जर्नल" व "दै. लोकमत" मधील जाहिर निविदा सुचना. २) दि.०४/१२/२०१० रोजीची "दै. फ्री प्रेस जर्नल" व "दै. लोकमत" मधील शुध्दी पत्रक. ३) मनपा संकेत स्थळावरील जाहीर निविदा सुचना व शुध्दीपत्रक प्रसिध्दी सदर नमुद वर्तमानपत्रांनूसार मनपा संकेत स्थळावर कोरी निविदा पत्रक उपलब्ध होती. तरी मुदतीत एकूण चार निविदा धारकांनी सदर कामाची कोरी निविदा पत्रके " DOWNLOAD" केलेली होती. त्यानूसार चार निविदा धारकांची दराचा लखोटा उघडणे अगोदर तांत्रिक लखोट्यातील (संकेतस्थळाद्वारे) प्राप्त कागदपत्रांपैकी एकूण तीन प्राप्त निविदा धारकांचे Commercial Bid Open करण्यात आले. त्याप्रमाणे खालील तपशिलांन्वये दर प्राप्त झालेले आहेत.

| Sr.no. | Particulars | Qty | M/s. Interchain Solution | | M/s. Efcom India Pvt. Ltd. | | M/s. HCL | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rates Per Unit Inclusive of Taxes | Total (All Inclusive) | Rates Per Unit Inclusive of Taxes | Total (All Inclusive) | Rates Per Unit | Total | Taxes | Total (All Inclusive) |
| 1 | GPS based vehicle Mounted Unit | 50 | 6500 | 325000 | 7540.16 | 377008 | 7523 | 376125 | 30654.19 | 406779 |
| 2 | LED display boards set per bus ( Front, Side, Rear, Inside) | 50 | 82500 | 4125000 | 141203 | 7060150 | 113475 | 5673750 | 462410.63 | 6136161 |
| 3 | LED Display Board with GPRS Modem on bus stop | 15 | 39500 | 592500 | 57286 | 859290 | 61200 | 918000 | 74817.00 | 992817 |
| 4 | Control room set up with personel Computers (2 nos.) + 1 nos. dot matrix printer + UPS + Broadband connectivity and all other necessary infrastructure as defined in specification | 1 | 78750 | 78750 | 150855 | 150855 | 860625 | 860625 | 70140.94 | 930766 |
| 5 | Installation Charges of GPS Devices, LED Board set per bus, LED Board at Bus | Lumpsum | 0 | - | - | - | 375000 | 375000 | 38625 | 413625 |
| | Stops | | | - | - | - | - | - | - | - |
| | Total Supply cost including installation | Rs. | 5121250 | - | - | 8447303 | - | - | - | 8880148 |

II. Additional Supply

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2 CCTV Cameras with MDVR 48 hours Recording and DC Charger with battery box for buses | 50 | 75500 | 3775000 | 47399.30 | 2369965 | 33150 | 1657500 | 135086.25 | 1792586 |
| 2. | Installation Charges | 50 | 0 | 0 | - | - | 2500 | 125000 | 12875 | 137875 |
| 3. | Total Supply cost including installation | Rs | 3775000 | - | - | 2369965 | - | - | - | 1930461 |

1. Operation & Maintenance of supply Items

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Operation Charges for GPS/GPRS bus tracking system maintenance charges after completion of warrantee for GPS/GPRS bus tracking system. | 50 | 100 | 5000 | 240.45 | 12022.5 | 369 | 18438 | 1899.06 | 20337 |
| 2. | Maintenance charges for LED boards installed on buses (front, Rear, Side and Inside) | 50 | 150 | 7500 | 328.70 | 16435 | 619 | 30938 | 3186.56 | 34124 |
| 3. | Operation charges for bus-bay LED display (Including SIM charges), Maintenance charges after completion of warrantee for bus bay LED display | 15 | 175 | 2625 | 253.70 | 3805.5 | 369 | 5531 | 569.72 | 6101 |
| 4. | Control Room Operation charges including connectivity, manpower and consumables | 1 | 25000 | 25000 | 38605 | 38605 | 107500 | 107500 | 11072.5 | 118573 |
| | Total for 1 Month | | 40125 | - | - | 70868 | - | - | - | 179134 |
| | Total for 5 Years | | 2407500 | - | - | 4252080 | - | - | - | 10748046 |
| The above rate include all maintenance, manpower, connectivity charges as defined in the tender | | | | | | | | | | |
| | TOTAL (A(1)+B(1) for 5 years) Rs. | 7528750 | - | - | - | 12699383 | - | - | - | 19628194 |

II. Operation & Maintenance of CCTV System

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Operation Charges for CCTV System | 50 | 220 | 11000 | 237.15 | 11857.5 | 325 | 16250 | 1673.75 | 17924 |
| | Total for 5 Years | RS. 660000 | - | - | - | 711450 | - | - | - | 1075440 |
| | TOTAL (A(II)+B(II) for 5 years) Rs. | 4435000 | - | - | - | 3081415 | - | - | - | 3005886 |
| | Grand Total | 11963750 | - | - | - | 15780798 | - | - | - | 22634080 |

उपरोक्त तुलनात्मक दराचा तक्ता पाहता मे. इंटरचैन सोल्युशन प्रा.लि. हे असून Lowest १ मे. ईफ्कॉन इंडीया प्रा.लि. हे आहेत. निविदा पत्रकातील अटी शती क्र.४ (ए) (बी) (सी) नूसार गुण प्राप्त झालेले होते.

(अ)

| Particulars | M/s. Interchain Solution Pvt.Ltd. | M/s. Efkon India Pvt.Ltd. | M/s. HCL |
|---|---|---|---|
| Total Technical & pre Qualification Score | 67 | 95 | 82 |

उपरोक्त तांत्रिक लखोट्यातील प्राप्त कागदपत्रानूसार मिळालेले गुण गृहीत धरुन दराचा लखोटा उघडल्यानंतर निविदा पत्रक अटीशर्ती क्र. ४ नूसार...

**A) Lowest – 100 marks (M/s. Interchain Solution Pvt.Ltd.)**

Final Bid Evalution Score – Pre Qualification & Technical Evalution Score X 0.6 + Commercial Score X 0.4

- 67 X 60% = 40.2
- 100 X 40% = 40

80.2

**B) Lowest 1 (M/s. Efkon India Pvt.Ltd.)**

Commercial Score of Bidder - (TC of LI/TC the Bidder) X 100 adjusted to 2 decimals.

- 15780798 / 11963750    1.31 X 100 = 131 / 2 = 65.5

अटी-शर्ती क्र. ४ प्रमाणे - 95 X 60% = 57

- 65.5 X 40% = 26.2

**83.2**

उपरोक्त नूसार गुणांकन केल्यास जास्तीत जास्त गुण मे. ईफ्कॉन इंडीया प्रा.लि., यांचे आहे, परंतू निविदेत कमी दर भरणारे मे. इंटरचैन सोल्युशन प्रा.लि. यांना ८०.२ इतके गुण प्राप्त झालेले आहेत. सदर कामाचे किंमतीमधील फरक रु. १,५७,८०,७९८ – १,१९,,६३,७५० = रु.३८,१७,०४८/- (अक्षरी अडतीस लाख सतरा हजार अठ्ठेचाळीस मात्र) आहे. तरी मे. इंटरचैन सोल्युशन प्रा.लि. यांची रक्कम रु. १,१९,६३,७५० या दराची निविदा स्विकारणेस आजची मा. स्थायी समिती सभा सर्वानुमते मान्यता देत आहे. परंतु, सदर कामी कार्यादेश दिल्यानंतर ३० दिवसांत संपूर्ण कार्यवाही पूर्ण करण्यात यावी अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**शशिकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ०२ :-**

परिवहन उपक्रमामध्ये जीपीआरएस सिस्टम लागु करणेस मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाने JNNURM या केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत मंजूर बसेस करीत केंद्र शासनाच्या धोरणानूसार बसेस करीता LED, GPS, CCTV, PIS पुरवठा करणे कामाची १) दि.२५/११/२०१० रोजीची "दै. फ्री प्रेस जर्नल" व "दै. लोकमत" मधील जाहिर निविदा सुचना. २) दि.०४/१२/२०१० रोजीची "दै. फ्री प्रेस जर्नल" व "दै. लोकमत" मधील शुध्दी पत्रक. ३) मनपा संकेत स्थळावरील जाहीर निविदा सुचना व शुध्दीपत्रक प्रसिध्दी सदर नमुद वर्तमानपत्रांनूसार मनपा संकेत स्थळावर कोरी निविदा पत्रक उपलब्ध होती. तरी मुदतीत एकूण चार निविदा धारकांनी सदर कामाची कोरी निविदा पत्रके " DOWNLOAD" केलेली होती. त्यानूसार चार निविदा धारकांची दराचा लखोटा उघडणे अगोदर तांत्रिक लखोट्यातील (संकेतस्थळाद्वारे) प्राप्त कागदपत्रांपैकी एकूण तीन प्राप्त निविदा धारकांचे Commercial Bid Open करण्यात आले. त्याप्रमाणे खालील तपशिलांन्वये दर प्राप्त झालेले आहेत.

| Sr.no. | Particulars | Qty | M/s. Interchain Solution | | M/s. Efcom India Pvt. Ltd. | | M/s. HCL | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rates Per Unit Inclusive of Taxes | Total (All Inclusive) | Rates Per Unit Inclusive of Taxes | Total (All Inclusive) | Rates Per Unit | Total | Taxes | Total (All Inclusive) |
| 1 | GPS based vehicle Mounted Unit | 50 | 6500 | 325000 | 7540.16 | 377008 | 7523 | 376125 | 30654.19 | 406779 |
| 2 | LED display boards set per bus ( Front, Side, Rear, Inside) | 50 | 82500 | 4125000 | 141203 | 7060150 | 113475 | 5673750 | 462410.63 | 6136161 |
| 3 | LED Display Board with GPRS Modem on bus stop | 15 | 39500 | 592500 | 57286 | 859290 | 61200 | 918000 | 74817.00 | 992817 |
| 4 | Control room set up with personel Computers (2 nos.) + 1 nos. dot matrix printer + UPS + Broadband connectivity and all other necessary infrastructure as defined in specification | 1 | 78750 | 78750 | 150855 | 150855 | 860625 | 860625 | 70140.94 | 930766 |
| 5 | Installation Charges of GPS Devices, LED Board set per bus, LED Board at Bus | Lumpsum | 0 | - | - | - | 375000 | 375000 | 38625 | 413625 |
| | Stops | | | - | - | - | - | - | - | - |
| | Total Supply cost including installation | Rs. | 5121250 | - | - | 8447303 | - | - | - | 8880148 |

II. Additional Supply

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2 CCTV Cameras with MDVR 48 hours Recording and DC Charger with battery | 50 | 75500 | 3775000 | 47399.30 | 2369965 | 33150 | 1657500 | 135086.25 | 1792586 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | box for buses | | | | | | | | | |
| 2. | Installation Charges | 50 | 0 | 0 | - | - | 2500 | 125000 | 12875 | 137875 |
| 3. | Total Supply cost including installation | Rs | 3775000 | - | - | 2369965 | - | - | - | 1930461 |

2. Operation & Maintenance of supply Items

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Operation Charges for GPS/GPRS bus tracking system maintenance charges after completion of warrantee for GPS/GPRS bus tracking system. | 50 | 100 | 5000 | 240.45 | 12022.5 | 369 | 18438 | 1899.06 | 20337 |
| 2. | Maintenance charges for LED boards installed on buses (front, Rear, Side and Inside) | 50 | 150 | 7500 | 328.70 | 16435 | 619 | 30938 | 3186.56 | 34124 |
| 3. | Operation charges for bus-bay LED display (Including SIM charges), Maintenance charges after completion of warrantee for bus bay LED display | 15 | 175 | 2625 | 253.70 | 3805.5 | 369 | 5531 | 569.72 | 6101 |
| 4. | Control Room Operation charges including connectivity, manpower and consumables | 1 | 25000 | 25000 | 38605 | 38605 | 107500 | 107500 | 11072.5 | 118573 |
| | Total for 1 Month | | 40125 | - | - | 70868 | - | - | - | 179134 |
| | Total for 5 Years | | 2407500 | - | - | 4252080 | - | - | - | 10748046 |
| The above rate include all maintenance, manpower, connectivity charges as defined in the tender | | | | | | | | | | |
| | TOTAL (A(1)+B(1) for 5 years) Rs. | 7528750 | - | - | - | 12699383 | - | - | - | 19628194 |

II. Operation & Maintenance of CCTV System

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Operation Charges for CCTV System | 50 | 220 | 11000 | 237.15 | 11857.5 | 325 | 16250 | 1673.75 | 17924 |
| | Total for 5 Years | RS. 660000 | - | - | - | 711450 | - | - | - | 1075440 |
| | TOTAL (A(II)+B(II) for 5 years) Rs. | 4435000 | - | - | - | 3081415 | - | - | - | 3005886 |
| | Grand Total | 11963750 | - | - | - | 15780798 | - | - | - | 22634080 |

उपरोक्त तुलनात्मक दराचा तक्ता पाहता मे. इंटरचैन सोल्युशन प्रा.लि. हे असून Lowest १ मे. ईफ्कॉन इंडीया प्रा.लि. हे आहेत. निविदा पत्रकातील अटी शती क्र.४ (ए) (बी) (सी) नूसार गुण प्राप्त झालेले होते.

(अ)

| Particulars | M/s. Interchain Solution Pvt.Ltd. | M/s. Efkon India Pvt.Ltd. | M/s. HCL |
|---|---|---|---|
| Total Technical & pre Qualification Score | 67 | 95 | 82 |

उपरोक्त तांत्रिक लखोट्यातील प्राप्त कागदपत्रानूसार मिळालेले गुण गृहीत धरुन दराचा लखोटा उघडल्यानंतर निविदा पत्रक अटीशर्ती क्र. ४ नूसार...

**B) Lowest – 100 marks (M/s. Interchain Solution Pvt.Ltd.)**

Final Bid Evalution Score – Pre Qualification & Technical Evalution Score X 0.6 + Commercial Score X 0.4

- 67 X 60% = 40.2

- 100 X <u>40% = 40</u>

80.2

**B) Lowest 1 (M/s. Efkon India Pvt.Ltd.)**

Commercial Score of Bidder - (TC of LI/TC the Bidder) X 100 adjusted to 2 decimals.

- $\frac{15780798}{11963750}$ 1.31 X 100 = $\frac{131}{2}$ = 65.5

अटी-शर्ती क्र. ४ प्रमाणे - 95 X 60% = 57

- 65.5 X 40% = 26.2

**83.2**

उपरोक्त नूसार गुणांकन केल्यास जास्तीत जास्त गुण मे. ईफ्कॉन इंडीया प्रा.लि., यांचे आहे, परंतू निविदेत कमी दर भरणारे मे. इंटरचैन सोल्युशन प्रा.लि. यांना ८०.२ इतके गुण प्राप्त झालेले आहेत. सदर कामाचे किंमतीमधील फरक रु. १,५७,८०,७९८ – १,१९,,६३,७५० = रु.३८,१७,०४८/- (अक्षरी अडतीस लाख सतरा हजार अठ्ठेचाळीस मात्र) आहे. तरी मे. इंटरचैन सोल्युशन प्रा.लि. यांची रक्कम रु. १,१९,६३,७५० या दराची निविदा स्विकारणेस आजची मा. स्थायी समिती सभा सर्वानुमते मान्यता देत आहे. परंतु, सदर कामी कार्यादेश दिल्यानंतर ३० दिवसांत संपूर्ण कार्यवाही पूर्ण करण्यात यावी अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.३, त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणे.

**भगवती शर्मा :-**

सन २०१०-११ आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोंबर २०१० ते डिसेंबर २०१० पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेऊन आजची सभा सन २०१०-११ आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोंबर २०१० ते डिसेंबर २०१० पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजुरी देत आहे.

**राजेश म्हात्रे :-**

सदरच्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०३ :-**

त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणे.

**ठराव क्र. ०३ :-**

सन २०१०-११ आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोंबर २०१० ते डिसेंबर २०१० पर्यंतचा त्रैमासिक जमा/खर्च अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

अंदाजपत्रकीय जमा/खर्च व प्रत्यक्ष जमा/खर्चाचा आढावा घेऊन आजची सभा सन २०१०-११ आर्थिक वर्षातील माहे ऑक्टोंबर २०१० ते डिसेंबर २०१० पर्यंतच्या त्रैमासिक जमा/खर्चास मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. राजेश म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४, **मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)** मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर व पाणी पुरवठा विभागासाठी संगणक प्लेन व प्रिप्रिंटेड स्टेशनरी खरेदी करणे. प्रकरण क्र.५, **मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)** मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागातील उपलब्ध असलेल्या प्रिंटरसाठी कन्झुमेबल स्टेशनरी पुरवठा करणे. प्रकरण क्र.६, **मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)**

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, हे संगणक विभागाचा आहे आपण स्टेशनरी वैगेरे देणार आहेत. मालमत्ता कर व पाणी पुरवठा विभागातील संगणक प्लेन प्रिटिंग स्टेशनरी खरेदी करणे बाबत. तर, मला संगणक विभागाला विचारायच आहे की आपली वेब साईट होती मिरा भाईदर महापालिकेची ती आता कार्यन्वित कशी आहे ? त्याच्यावर सविस्तर माहिती दिली तरी चालेल. कारण, माझ्या माहितीप्रमाणे जेव्हा सुरू केल. त्यावेळचे सभापती होते. त्यावेळचे महापौर सोा होते. त्यांच्यात आता बदल होतो की, आता स्थायी समितीचे सभापती सोा म्हणून स्टिवन मेन्डोसा आले. त्यांच आता नाव नाही. सगळे जुनेच आहे. अदयापपर्यंत किंवा नविन इमरती बांधणी त्याचा फोटो पाहणे किवा कलर गेला त्याचा फोटो पाहिजे ते का येत नाही. जुने आहे तेच मग, अस का? याच्याबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली तर बर होईल आपण वेब साईट चालू केलेली आहे. ते आपण मागचीच दाखवणर का ? आता मिरा भाईदर महापालिकेत काय बदल झाले आहेत त्या बद्दल लोकांना काही माहिती देणार नाही का ? त्यानंतरची तुमची विचारणा काय आहे तुम्ही निवेदन करावा .

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती साहेब, २ (के) खाली मे एक विषय है उसके लिए में मंजुरी लेना चाहता हूँ मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २ (के) अन्वये एक प्रस्ताव है सन २०११-१२ या आर्थिक वर्षात पावसाळयापूर्वी कच्चे पक्के नाले साफसफाई खोदाई व गाळ वाहतूक काढणे आदि कामाभवती माझा विषय आहे. तर शेवटी हा विषय घेण्यात यावा. अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे सर्वाची हा विषय घ्यायला मान्यता आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, पावसाळयापूर्वी मिच बोलणार होतो की, पावसाळयाच्या पूर्वी ३ महिने हातात राहिलेले आहे. तर पावसाळयापूर्वी जर साफसफाई झाली नाही नंतर कुठे पाणी तुंबले.......

**मा सभापती :-**

साफसफाई झालीच पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

आता समजा, कूठे माती भराव केला असेल ते पण खोदायच असेल तर खोदू शकता. तिकडचा माती किवा काढलेला गाळ पण उचलून नेवू शकतो. त्यामुळे आमची पण प्रामाणिक इच्छा आहे. कारण दोष तूम्हाला आम्हालाच आहे. कारण आपण लोकप्रतिनिधी आहोत. त्यानंतर आयुक्त्याच्या पूढे दाखवणार की आयुक्तांनी काय केल?

**मा. आयुक्त ::-**

त्यामध्ये फक्त एक चुकुन शब्द राहिला नाले सफाईचा २० तारखेला आपण दुरुस्ती दिलेली आहे. आणि आता २० तारखेला मंजूरी झाल्यानंतर टेंडर काढणे, मंजूर करणे, आणि कामाला सुरु करणे उशिर होईल म्हणून आम्ही स्टँडींग चे पाठिमागचे मंजूर दर आहेत त्याच दरामध्ये ठेकेदार करायला तयार आहे का असं विचारलं तर त्यांनी होकार दिला म्हणून तो विषय आणला.

**शशिकांत भोईर :-**

चांगल आहे. त्याच्यावर आपण सविस्तर चर्चा करु. परंतु, निवेदन यांनी केले तर बरे होईल. मिरा भाईंदरची वेब साईट आहे. त्याच्यावर पूर्ण आजची माहिती का नाही? त्याच्यावर आपण कुठला कर्मचारी नियुक्ती केला नाही का त्याची माहिती द्यायला.

**राजकुमार घरत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, वेब साईट अपडेशन आहेत. वेब साईटचं मागच्या वेळेला आपण दरपत्रक मागवून बनवलेली आहे. त्याच्यात अपडेशन ची फॅसिलिटी अजून नाही. त्यांच्याकडुन अजून नविन दरपत्रक आणलेलं आहे. वेबसाईट अपडेट करण्याचं टुल आपल्याकडे दिलेले नाही त्यासाठी त्यांनी नविन दरपत्रक दिलेलं आहे. त्याच्यात आपल्याला सर्व सभापती किंवा इतर सदस्य आहेत, सर्व कमिटी आहेत ते आपल्याला टुल बनवून देतील. मग त्या वेबसाईट वर आपल्याला जे बदल करायचे आहे. कमिटी मेंम्बर आहेत त्यांचे फोटो किंवा ज्याची इंन्फॉर्मेशन आपल्याला ॲड करायचं असेल तर ती त्याला करता येईल. आता सध्या जी वेबसाईट आहे ती स्टॅटीक आहे. त्यात जर बदल करायचं झालं तर आपल्याला त्यांच्याकडे जायला लागेल.

**शशिकांत भोईर :-**

माझा प्रशासनाला असा प्रश्न आहे की, आपण अपडेट करणं हे गरजेचं आहे. कारण दरवर्षी बदल होत असतो ना आपल्या मिरा भाईंदरची माहिती, इचलकरंजी आहे किंवा अन्य महापालिका असेल त्यांना जर घ्यायचं असेल तर त्यांना अधुरी मिळेल. त्यांना माहित पडणार नाही आताचे महापौर कोण आहेत किंवा त्यांची प्रवृत्ती काय आहे? किती बजेट आहे हे त्यांना मिळू शकणार नाही.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त सो. (मु.)) :-**

प्रभारी सिस्टिम मॅनेजर ने जी माहिती त्याच्यामध्ये मी काही दुरुस्ती करु इच्छितो वेब साईट स्टॅटीक आहे हे मान्य आहे. पण स्टॅटीक जो डेटा आहे हा आपल्या स्तरावर अपडेट करता येतो. येतो की नाही हे त्यांना सांगायचं? आपल्या स्तरावर करता येतो. त्यांना जमत नसेल तर तो मी करुन देईल. याच्यासाठी परत नविन दरपत्रक मागवा. परत नविन दरपत्रक मागवा, परत त्या दरपत्रकाप्रमाणे मंजूर करा आणि मग ते कोणाला डेटा अपलोड करायला सांगायचं असं नाही हा डे टू डे बेसिस वर

**मा. सभापती :-**

तस जर होत असेल तर मग का होत नाही?

**मा. आयुक्त :-**

त्यांनी तो करायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

तुम्ही ते करायला पाहिजे तुम्ही त्यांच्याकडुन करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे मी त्यांच्याकडुन करुन घेईन.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही हेड ऑफ द डिपार्टमेंट चे मेन आहात ना तर तुम्ही ते करुन घ्यायला पाहिजे. आजची मिरा भाईंदरची काय माहिती आहे ती माहिती समोरच्या व्यक्तीला मिळायला पाहीजे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त सो. (मु.)) :-**

ती माहिती आपल्या डायरीच्या अनुषंगाने दरवेळेला अपडेट होत असते. आपल्याकडे डायरीच्या अनुषंगाने जी माहिती सध्या झालेली आहे ती जशीच्या तशी माहिती अपलोड करु शकतो.

**शशिकांत भोईर :-**

आज आपला बजेट आहे. बजेट किती करोडचा आहे? मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये कोणती योजना चालू आहे. सर्व माहित पडले पाहिजे ना.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त सो. (मु.)) :-**

याच्यामध्ये मराठीत माहिती कशी अपलोड करावी आणि आपला इंटरफेस मराठी कसा करावा याच्याकरीता.........

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, असं आहे की, त्याची पूर्ण माहिती आणि मला असं वाटतं की त्या डिपार्टमेंट चे प्रमुख राऊत साहेब आहे ना आता त्यांच्याकडुन होत नाही. तुम्ही आता करुन घेणार तर याच्या अगोदर साहेब तुम्ही जबाबदारीने करायला पाहीजे होतं.

**स्नेहा पांडे :-**

राऊत साहब, हर चीज बताने के बाद क्यों करते है?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त सो. (मु.)) :-**

या सर्वांनी स्वमुखी करायला पाहिजे आणि ही माहिती आपल्याकडे तयार आहे. तयार आहे म्हणजे डायरीच्या माध्यमातून तयार आहे. त्या-त्या विभागाकडून ती माहिती अपडेट होत राहते. उदा. आपण आरटीआय चं कलम ४ प्रमाणे काही जे Voluntary Discloser या पध्दतीने प्रत्येक विभागाकडुन माहिती घेऊन ती माहिती यापूर्वी अपलोड केली होती आणि त्या माहितीचे अपडेशन हे नियतकालिक होणं अपेक्षित आहे. जर आरटीआय खाली आपण माहिती अपलोड केली होती असा पध्दतीने बाकीच्या विभागाची पण माहिती आपल्या सरळ अपलोड होऊ शकते.

**शशिकांत भोईर :-**

होऊ शकते तर का केली नाही?

**भगवती शर्मा :-**

अभी मुझे एक बात बताओ की, सिमा मिश्रा मॅडम के जाने के बाद इस डिपार्टमेंट का हेड कौन है?

**शशिकांत भोईर :-**

हेड ऑफ दि डिपार्टमेंट होगे तो भी उपायुक्त साहब के हात मे है ना।

**मा. आयुक्त :-**

त्यांना जर जमत नसेल आणि राऊत साहेब करुन देतो असं म्हटलेलं आहे ते करुन घ्यायला पाहिजे होतं. ते घेतलेलं नाही तर ते आता करुन घ्याव. इतका वेळ थांबायचं कारणचं नाही.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहेब, हमेशा ऐसा ही क्यो होता है की, हम लोग जब बोलते है उसके बाद ही होता है। कोई काम तो हेड ऑफ दि डिपार्टमेंट बनाया गया। सब अलग-अलग डिपार्टमेंट है तो काम करना चाहिए।

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजूर करण्यात येत आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती साहब की, परवानगी से अनुमती लेना चाहता हूँ की, शहर के अंदर मे युनिक कार्ड की योजना चल रही है। मुझे यह मालुम नही ईस्ट ने कैसी व्यवस्था है, मिरारोड मे कैसी व्यवस्था है। लेकीन भाईंदर पश्चिम की स्थिती के बारे मे आयुक्त साहब आपको भी बारबार अवगत कराया की, वहाँ स्थिती ऐसी है की, सुबह ५-६ बजे लोग जाकर लाईन लगाते है। और सुबह जब ऑफीस खुलता है उस समय के १५ मिटि मे हाऊसफुल का बोर्ड लग जाता है। लोग नोकरी छोड के वहाँ पे जाते और वापर आते है। आपने हमको लेटर भेजा और हमने अपने वॉर्ड मे प्रसिध्दी भी कर दी है। स्थिती ऐसी है की, हमको सबको जवाब देना भारी पडता है। मा. आयुक्त साहब, और सचिव साहब आप भी ध्यान से सुनिएगा की, आपने भाईंदर वेस्ट को अलग किया उसके बाद यह हुआ की, उत्तन से लोग यहाँ लम्बा नही आना चाहिए। उनको वहाँपर सुविधा देंगे राई मुर्धा का एक पट्टा आपने बनाया था। आपने राई मुर्धा मे तो एक पट्टा आपने बनाया था। आपने राई मुर्धा मे तो चालु कर दिया था। लेकीन स्थिती ऐसी है की, उत्तन मे बिलकुल भी चालू नही किया है। हमने आपके  कहे नुसार प्रभाग अधिकारी के नंबर सबको दिये कोई भी अडचण हो तो प्रभाग अधिकारी को संपर्क करो प्रभाग अधिकारी भी वहाँपर जवाब देने के लिए उपलब्ध नही है। ऐसी स्थिती हो रही है के इसके अंदर मे कुछ ना कुछ आप सभी के सामने दिशानिर्देष जारी करीए ताकी यही सुचना शहर के अंदर आएगी आप जिसजिस के माध्यम से पेपरों के माध्यम से प्रसिध्दी दे सकते दिजीए। क्योकी लोग अपनी नोकरी छोडके जा रहे है।

**रामनारायण दुबे :-**

मा. आयुक्त साहब, मिरारोड मे केवल १०० फॉर्म दिया जाता है और लोग ६ बजे से लाईन लगाते है और कितने लोग तो वापस जाते है। ऐसे स्थिती मे मेरा एक सुझाव है की हर एक वॉर्ड मे.........

**भगवती शर्मा :-**

इस मिटींग मे नही यह हमेशा हो रहा है। हमलोग हमेशा स्टॅंडींग के सदस्य बोला है। चार प्रभाग अधिकारी को बोलते है चाहे विषय हो या ना हो लेकीन कभी भी हाजीर नही होते है। आज कितने हाजिर है और जो हाजिर नही है वह क्यो नही है?

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, हा गोंधळ आमच्या लक्षात आला आणिकाही सभासदाने आमच्या निदर्शनास आणलं त्याप्रमाणे प्रभाग अधिकारी, बांधकामाचे इंजिनिअर आणि पाणी पुरवठ्याचे इंजिनिअर आणि प्रभाग समितमध्ये असलेल्या कर विभागाचा स्टाफ. विप्रो चे अधिकारी आणि महा ऑनलाईन चे अधिकारी यांना संयुक्तपणे जाऊन कुठल्या तारखेला किती वाजता यायचं असं घरोघर जाऊन चिठ्ठया द्यायच्या आणि टायमिंग सांगायचं असं अपॉईटमेंट केलेलं आहे. ते गेल्या ८ तारखेला मिटींग घेऊन सगळ्या कल्पना दिलेली आहे. प्रभाग समिती वाईज कोणत्या बिल्डींगा किती तारखेला किती वाजता यायचे ते ठरवून देण्याविषयी आदेश दिलेले आहेत. त्याबरोबर त्यांच्याबरोबर आमच्या स्टाफ बरोबर विप्रो चे अधिकारी आणि महाऑनलाईन चे अधिकारी सुध्दा जाणार आहेत आणि हा जवळ जवळ दिड वर्षाचा कार्यक्रम आहे. दिड वर्षाचा कार्यक्रम असल्यामुळे वेस्ट मध्ये झोपडपट्टीची लोकं जास्त गर्दी करायला लागले आहेत. जे आपले सदन लोक आहेम मध्यम वर्ग आहेत हे काय गडबड जास्त करत नाही. परंतु, झोपडपट्टीची लोकं यावरनं झोपड्या मिळणार असं समजून लाईन जास्त लावायला लागले आहेत. प्रत्यक्षात त्याझोपडीचा आणि कार्डाचा काही संबंध नाही. तो भारतीय नागरीक आहे एवढचं सिध्द होणार आहे आणि त्याचा उपयोग ०१-०१-१९९५ पूर्वीचा होतो किंवा झोपड्या अधिकृत झाल्या असं काही नाही. फक्त भारतामध्ये तो माणूस कुठे ही गेला तरी हा भारतीय नागरीक आहे. यासाठीचं तो आहे हे आम्ही सुध्दा प्रसिध्दीकरण करतो. केबल वर पण देतो आणि आमच्या स्टाफ ला अपॉईटमेंट पण केलेलं आहे.

**भगवती शर्मा :-**

साहेब, ते कधीपासून जाणार? आम्हाला सांगा ना प्रत्येक विभागाला प्रसिध्दी द्याना.

**स्नेहा पांडे :-**

अभी घर-घर मे कबसे शुरु करेंगे? तो फिर हम सबको बोलते है की लाईन लगाना बंद कर दो क्योकी सब घर घर मे बोलने आ रहे है।

